RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# बी. एड. छात्राध्यापकांना इतिहास पाठनियोजनात येणाऱ्या समस्यांवरील उपाययोजनांचे माहिती पुस्तिकेद्वारे संप्रेषण व परिणामकारकतेचा अभ्यास

**डॉ. रावसाहेब केराप्पा शेळके**
सहाय्यक प्राध्यापक
आचार्य जावडेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गारगोटी, जि.कोल्हापूर
e-mail – drrkshelake@gmail.com
Mob.No.8275459230

## प्रास्ताविक

"Planning is essential for economy & efficiency in any organisation. Even an individual has to do some sort of planning either mental or written for utilising his resources including mony & time in the best possible use."

शिक्षकालाही शिक्षक म्हणून अनेक प्रकारची नियोजने करावी लागतात. उदा. वार्षिक नियोजन, घटक नियोजन, पाठ नियोजन, स्वाध्यायांचे नियोजन, सहशालेय उपक्रमांचे नियोजन, कार्यानुभव कृतींचे नियोजन इत्यादी. वार्षिक नियोजन हे ढोबळ स्वरूपाचे असते. मात्र पाठ नियोजन, विशिष्ट तासिकेला, विशिष्ट विषयाचे, विशिष्ट वेळेत काय शिकायचे? कसे शिकायचे, यामध्ये कोणती उद्‌दि्ष्टे साध्य करायची त्यासाठी कोणते अध्ययन, अनुभव द्यायचे ? त्या पाठाच्या वेळेत शिक्षक विद्यार्थी यांच्या कृती कोणत्या, पाठाचे संकलन, उपायोजन, कसे करायचे, गृहपाठ स्वाध्याय कोणता द्यायचा, फलकावर काय लिहायचे? इत्यादी बाबींचे बारकाईने नियोजन करावे लागते. अनुभवी, प्रशिक्षणार्थी शिक्षकांना याचे नियोजन प्रयत्नपूर्वक, समजून घेवून करावे लागते.

इतिहासासारखा विषय जो भूतकालीन घटना, घडांमोडीवर आधारीत आहे हा इतिहास विषय विद्यार्थ्यांसमोर अध्यापन करण्यासाठी त्याचे पाठनियोजन प्रथम अचूक होणे गरजेचे आहे. प्रशिक्षणार्थी शिक्षक हे पदवीपर्यंत अथवा पदव्युत्तर पदवीपर्यंत विविध विषय शिकत आलेले आहेत. त्यामुळे अध्ययन कसे करायचे हे त्यांना माहित असते मात्र अध्यापन केलेला भाग यांचे अध्यापन कसे करावे यासंबधी ते अनभिज्ञ असतात. म्हणून एखादा घटकाचे अध्यापन करण्यापूर्वी त्या घटकाचे पाठ नियोजन केले तर काय शिकवायचे याचा एक आराखडा नजरेसमोर येतो व त्याप्रमाणे अध्यापन करणे सोयीचे होते. इतिहास अभ्यासक्रमाची रचना ही समकेंद्री व कालानुक्रमे पद्‌धतीने केलेली आहे. त्यामुळे विशिष्ट इयत्तेतील इतिहासाचा एखादा घटक शिकवण्यासाठी अभ्यासक्रमातील स्तरानुसार त्या इयत्तेपूर्वी संबधीत घटकाविषयी माहिती शालेय विद्यार्थ्यांना कितपत आहे याचा अंदाज घ्यावा लागतो. त्यासाठी प्रशिक्षणार्थींनी प्रथम सर्व इयत्तांमधील इतिहास पाठयपुस्तकांचा अभ्यास करणे गरजेचे असते.

बी. एड. प्रशिक्षण महाविद्यालयांमध्ये वरील बाबींच्या अनुषंगाने सूक्ष्म अध्यापन कृतीसत्रानंतर पाठ नियोजन कृतीसत्राचे आयोजन केले जाते. त्यासाठी प्रथम त्यांना अध्यापन पद्‌धतीचे मार्गदर्शक नमुना पाठांचे दिग्दर्शन करतात. पाठ नियोजनातील सर्व बारकावे सांगतात व प्रशिक्षणार्थींकडून निवडलेल्या अध्यापन पद्‌धतींची पाठ टाचणे काढून घेतली जातात. मात्र या सर्व गडबडीच्या कालखंडात पाठ नियोजनात अनेक प्रकारच्या चुका प्रशिक्षणार्थींकडून होतात, त्यातील काही चुका सामान्यपणे सर्व प्रशिक्षणार्थींकडून घडतात. त्या चुका टाळण्यासाठी पाठ टाचणातील विविध मुद्‌दयांमधील परस्पर संबंध

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

प्रशिक्षणार्थींच्या लक्षात आणून देण्यासाठी माहिती पुस्तिका तयार करून तिचे संप्रषण केल्यास, तसेच पाठ नियोजनातील मुद्यांमधील तात्काळ मार्गदर्शनावेळी लक्षात आणून दिल्यास व एक – एका मुद्यांचे बारकावे विवेचन मार्गदर्शनावेळी प्रशिक्षणार्थिंनी निवडलेल्या पाठनियोजन घटकांत येणाऱ्या अडचणी कमी करता येतील या अनुषंगाने प्रस्तूत संशोधन पूर्ण केले आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे

1) बी. एड. छात्राध्यापकांना इतिहास पाठ नियोजनात येणाऱ्या अडचणी / समस्यावंर उपाययोजना करण्यासाठी इतिहास पाठनियोजन माहिती पुस्तिका विकसित करणे.
2) बी.एड. छात्राध्यापकांना इतिहास पाठ नियोजनात येणाऱ्या अडचणी / समस्यांवरील उपाययोजना म्हणून विकसित केलेली माहिती पुस्तिका छात्राध्यापकांना संप्रेषित करणे.
3) बी. एड. छात्राध्यापकांना इतिहास पाठ नियोजनातयेणाऱ्या समस्यांवरील उपाययोजना म्हणून संप्रेषित केलेल्या माहिती पुस्तिकेची परिणामकारता अभ्यासणे.

## संशोधनाची गृहितके

1) बी. एड. महाविद्यालयांमध्ये इतिहास ही एक अध्यापन पद्धती आहे.
2) बी. एड. छात्राध्यापक दोन अध्यापन पद्धतीच्या विषयाचे पाठ नियोजन करतात.
3) बी. एड. छात्राध्यापकांना इतिहास विषयाचे पाठ नियोजन करताना समस्या येतात.
4) बी. एड. छात्राध्यापकांना पाठ नियोजनात येणाऱ्या समस्यांवर माहिती पुस्तिकांद्वारे उपाययोजना करता येते.

## संशोधन शून्य परिकल्पना

बी. एड. छात्राध्यापकांना इतिहास पाठ नियोजनात येणाऱ्या अडचणी/समस्यांवरील उपाययोजना यासाठी विकसित केलेली माहिती पुस्तिका यामध्ये माहितीस्तरावर परस्पर सहसबंध नाही.

## संशोधनाची पर्यायी परिकल्पना

बी. एड. छात्राध्यापकांना इतिहास पाठ नियोजनात येणाऱ्या अडचणी/समस्यांवरील उपाययोजना म्हणून विकसित केलेली माहिती पुस्तिका यामध्ये माहितीस्तरावर परस्पर सहसंबध आहे.

## संशोधनाची व्याप्ती

1) प्रस्तुत संशोधनात शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील इतिहास अध्यापन पद्धतीचे छात्राध्यापक सहभागी आहेत.
2) प्रस्तुत संशोधनात बी. एड. महाविद्यालयातील विविध प्रात्याक्षिकांपैकी पाठ नियोजन कृतीसत्राशी निगडीत आहे.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

3) प्रस्तुत संशोधनात इतिहास पाठ नियोजनात बी. एड. छात्राध्यापकांना येणाऱ्या अडचणीवरील उपाययोजना म्हणून विकसित केलेली माहिती पुस्तिका छात्राध्यापकांना संप्रेषित करून परिणामकारकता अभ्यासणे ही या संशोधनाची आशयात्मक तसेच संकल्पनात्मक व्याप्ती आहे.

## संशोधनाच्या मर्यादा

1) प्रस्तुत संशोधन बी. एड. महाविद्यालयातील 'पाठ नियोजन' या प्रात्यक्षिकापुरते मर्यादित आहे.
2) प्रस्तुत संशोधन हे शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरशी संलग्नित आचार्य जावडेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय व डॉ.डी. वाय. पाटील शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील इतिहास अध्यापन पद्धतींच्या 60 छात्राध्यांपकांपुरते मर्यादित आहे. तसेच या महाविद्यालयांच्या पाठ नियोजन आराखड्यांपुरते मर्यादित आहे.
3) शैक्षणिक वर्ष 2010 – 11 मध्ये बी. एड. प्रशिक्षण घेणाऱ्या छात्राध्यापकांपुरते मर्यादित आहे.

## संशोधन पद्धती

## केवळ उत्तर परीक्षण नियंत्रित गट अभिकल्प

प्रस्तुत संशोधनासाठी केवळ उत्तर परीक्षण नियंत्रित गट अभिकल्पाची निवड केली जाते. या अभिकल्पात पूर्वोतर परीक्षण नियंत्रित गट अभिकल्पाप्रमाणेच प्रायोगिक व नियंत्रित गटाची निवड यादृच्छिकरणाच्या आधारे केली जाते. प्रायोगिक गटास स्वाधीन चलाची उपचार मात्रा (X) विशिष्ट कालावधीपर्यंत दिली जाते व नियंत्रित गट स्वाधीन चलाच्या संपर्कापासून पूर्णतः अलिप्त ठेवला जातो किंवा त्यास दुसऱ्या पर्यायी चलाची मात्रा दिली जाते. मात्र या अभिकल्पात पर्वपरीक्षणाची व्यवस्था नसते हे लक्षात ठेवावयास हवे. प्रयोगाच्या शेवटी दोन्ही गटाचे आश्रीत चलाच्या बाबतीत उत्तर परीक्षण ($0_1$ व $0_2$) केले जाते. या अभिकल्पाचे रेखांकन पुढीलप्रमाणे

| गट | उपचार | उत्तर परीक्षण |
|---|---|---|
| प्रायोगिक | X | $0_1$ |
| नियंत्रित | – | $0_2$ |

केवळ उत्तर परीक्षण नियंत्रित गट अभिकल्प

## नमुना निवड

प्रस्तुत संशोधनासाठी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरशी संलग्नित 42 शिक्षणशास्त्र महाविद्यालयांपैकी श्री मौनी विद्यापीठ संचलित, आचार्य जावडेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गारगोटी व डॉ. डी. वाय. पाटील प्रतिष्ठान संचिलत डॉ. डी. वाय. पाटील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात, गारगोटी या दोन बी. एड. महाविद्यालयांची निवड सहेतूक नमुना निवडीने केली.

इतिहास अध्यापन पदधतीचे प्रथम व द्वितीय अध्यापन पदधती असणारे छात्राध्यापक नमुना निवड करण्यासाठी सुगम यादृच्छिकरणाचा (लॉटरी पदधती) वापर केला.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

## संशोधन साधने

## (इतिहास पाठ नियोजन माहिती पुस्तिका)

संशोधकाने स्वतःचा बी. एड. स्तरावरील सहा वर्षाचा अनुभव विचारात घेवून इतिहास पाठ नियोजनात छात्राध्यापकांकडून सामान्यपणे कोणत्या चूका होतात, चूकांची पुनरावृत्ती कोणत्या मुद्यांसंदर्भात होते, पाठ नियोजनातील कोणते मुद्दे लिहताना छात्राध्यापकांना अडचणी येतात इत्यादी बाबींचा विचार करून त्यावर आधारीत माहिती पुस्तिका तयार करून छात्राध्यापकांना संप्रेषित केली आहे.

## इतिहासात पाठ नियोजनातील समस्या निश्चिती चाचणी

संशोधनामध्ये माहिती संकलनासाठी 'इतिहासात पाठ नियोजनातील समस्या निश्चिती चाचणी' संशोधकाने विकसित केली. या चाचणीच्या साहय्याने माहिती संकलन प्रायोगिकव नियंत्रित गटाकडून केले आहे.

## संख्याशास्त्रीय तंत्रे

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधक विकसित 'इतिहासात पाठ नियोजनातील समस्या समस्या निश्चिती चाचणी' द्वारे माहिती संकलित करण्यात आली. या संकलित माहितीच्या विश्लेषणासाठी मध्यमान, प्रमाण विचलन व टी चाचणी या संख्याशास्त्रीय तंत्रांचा वापर केला आहे.

## संकलित माहितीचे विश्लेषण

## सारणी क्र. 1

इतिहास पाठ नियोजनातील समस्या निश्चिती चाचणीत प्रायोगिक गटातील छात्राध्यापकांनी प्रश्नांना 'होय व नाही' असा प्रतिसाद दिला त्यानुसार 'इतिहास पाठ नियोजन माहिती पुस्तकेची परिणामकारकता

| गट प्रायोगिक | प्रतिसादक छात्राध्यापक संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | सार्थकता स्तर | प्रमाणित टी गुणांक | प्राप्त टी | स्वाधिनता मात्रा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| होय | 30 | 5.73 | 3.77 | 0.05 | 1.699 | 4.21 | 29 |
| नाही | 30 | 24.27 | 4.12 | 0.01 | 2.462 | | |

## निरीक्षण

वरील सारणी क्र. 1 मध्ये इतिहास पाठ नियोजनातील समस्या निश्चिती चाचणीत विचारलेल्या प्रश्नांना प्रायोगिक गटातील छात्राध्यापकांनी दिलेल्या होय प्रतिसादानुसार मध्यमान 5.73 इतके आले आहे. तर नाही प्रतिसादानुसार मध्यमान 24.27 इतके आले आहे. तसेच होय व नाही प्रतिसादानुसार प्रमाण विचलन अनुक्रमे 3.77 व 4.12 इतके आहे. 29 स्वाधिनता मात्रेचे प्रमाणित टी गुणांक 0.05 सार्थकता स्तरावर 1.699 व 0.01 सार्थकता स्तरावर 2.462 इतके आहे. प्राप्त टी मूल्य 4.21 इतके आले आहे.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

### अन्वयार्थ

वरील सारणी क्र. 2 मध्ये इतिहास पाठ नियोजनातील समस्या निश्चिती चाचणीत विचारलेल्या प्रश्नांना प्रायोगिक गटातील छात्राध्यापक होय असा प्रतिसाद देणाऱ्यांचे मध्यमान हे नाही असा प्रतिसाद देणऱ्यांच्या तुलनेत फारच कमी आहे. तसेच 0.05 व 0.01 सार्थकता स्तरावर 29 स्वाधिनता मात्रेचे प्रमाणित टी गुणांकापेक्षा प्राप्त टी मूल्य हे जास्त आहे. यावरून संशोधन शून्य परिकल्पनेचा त्याग केला आहे. तसेच यावरून प्रायोगिक गटातील छात्राध्यापकांना इतिहास पाठनियोजनात येणाऱ्या समस्या कमी करण्यासाठी संशोधकाने विकसित करून संप्रेषित केलेली माहिती पुस्तिका परिणामकारक ठरली आहे.

## सारणी क्रं 2

इतिहास पाठ नियोजनातील समस्या निश्चिती चाचणीत नियंत्रित गटातील छात्राध्यापकांनी प्रश्नांना 'होय व नाही' असा प्रतिसाद दिला त्यानुसार इतिहास पाठ नियोजनातील समस्या निश्चिती

| गट नियंत्रित | प्रतिसादक छात्राध्यापक संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | सार्थकता स्तर | प्रमाणित टी गुणांक | प्राप्त टी | स्वाधिनता मात्रा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| होय | 30 | 18.63 | 5.73 | 0.05 | 1.699 | 5.17 | 29 |
| नाही | 30 | 11.37 | 4.35 | 0.01 | 2.462 | | |

### निरीक्षण

वरील सारणी क्र. 2 मध्ये इतिहास पाठ नियोजनातील समस्या निश्चिती चाचणीत विचारलेल्या प्रश्नांना नियंत्रित गटातील छात्राध्यापकांनी दिलेल्या होय प्रतिसादानुसार मध्यमान 18.63 इतके आले आहे. तर नाही प्रतिसादानुसार मध्यमान 11.37 इतके आले आहे. तसेच होय व नाही प्रतिसादानुसार प्रमाण विचलन अनुक्रमे 5.73 व 4.35 इतके आहे. 29 स्वाधिनता मात्रेचे प्रमाणित टी गुणांक 0.05 सार्थकता स्तरावर 1.699 व 0.01 सार्थकता स्तरावर 2.462 इतके आहे. प्राप्त टी मूल्य 5.17 इतके आले आहे.

### अन्वयार्थ

वरील सारणी क्र. 2 मध्ये इतिहास पाठ नियोजनातील समस्या निश्चिती चाचणीत विचारलेल्या प्रश्नांना नियंत्रित गटातील छात्राध्यापक नाही असा प्रतिसाद देणाऱ्यांचे मध्यमान हे होय असा प्रतिसाद देणऱ्यांच्या तुलनेत कमी आहे. तसेच 0.05 व 0.01 सार्थकता स्तरावर 29 स्वाधिनता मात्रेचे प्रमाणित टी गुणांकापेक्षा प्राप्त टी मूल्य हे जास्त आहे. यावरून संशोधन शून्य परिकल्पनेचा त्याग केला आहे. यावरून नियंत्रित गटातील छात्राध्यापकांना इतिहास पाठनियोजनात समस्या जास्त प्रमाण जाणवतात.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

## संशोधनाचे निष्कर्ष

1 प्रायोगिक गटातील छात्राध्यापकांमध्ये इतिहास पाठनियोजनात समस्या कमी प्रमाण जाणवणारे सर्वाधिक आहेत. (सारणी क्र.1)

2 नियंत्रित गटातील छात्राध्यापकांना प्रायोगिक गटातील छात्राध्यापकांच्या तुलनेत इतिहास पाठनियोजनात समस्या जास्त प्रमाण जाणवतात. ( सारणी क्र.1व 2)

## शिफारशी

1. बी. एड. महाविद्यालयांनी पाठ नियोजन कृतीसत्रासाठी अधिक वेळ द्यावा.
2. शिक्षक प्रशिक्षकांनी पाठ टाचणीतील सर्व बारकावे छात्राध्यापकांच्या लक्षात आणून द्यावेत.
3. शिक्षक प्रशिक्षकांनी अध्यापन पद्धतीनुसार पाठ टाचणीतील मुद्यांमधील परस्पर संबंध छात्राध्यापकांच्या लक्षात आणून द्यावा.
4. पाठ नियोजन मार्गदर्शकांना दाखविण्यापूर्वी ते स्वयंमूल्यमापनाने छात्राध्यापकांनी स्वतः तपासावे व त्यामध्ये लक्षात आलेल्या चुका अथवा कमतरतांप्रमाणे बदल करून सादर करावे याची सवय मार्गदर्शकांनी छात्राध्यापकांना लावावी.
5. शिक्षक प्रशिक्षकांनी अध्यापन पद्धतीनुसार पाठ नियोजनासाठी छोटयाशा माहिती पुस्तकांचे विकसन करावे.
6. अध्यापन पद्धतीनुसार अचूक पाठ नियोजन स्पर्धांचे आयोजन करावे.

## संदर्भ ग्रंथ सूची

1ण खताळ, मोहन (2009) **इतिहास आशययुक्त अध्यापन**. पुणेः नित्य नूतन प्रकाशन.

2ण दुनाखे, अरविंद (2000) **इतिहासाचे अध्यापन**. पुणेः नूतन प्रकाशन.

3ण पंडित, बन्सी बिहारी (2007) **शिक्षणातील संशोधन**. पुणेः नित्य नूतन प्रकाशन.

4ण यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (2003) **पाठनियोजन कौशल्य.** नाशिक.

5ण शिंदे, ज्ञानदेव, टोपकर रेखा (2009) **इतिहासाचे आशययुक्तअध्यापन.** पुणेः नित्य नूतन प्रकाशन.

6. Wadhwa ,Shalini (2010)**Modern Methods of Teaching.** New Delhi :Sarup &Sons.

7. Watson, Fostor (1989)**The Encyclopedia and Dictionary of Education**. Delhi: Akashdeep Publishing House.